# नाही झाली फुले कळ्यांची .............

- प्रमोद साठे - डुलूथ, ॲटलांटा , जॉर्जिया



'सलीम उठो बेटा, स्कूल जानेका वक्त हो रहा है |' अम्मी सलीमला शाळेसाठी उठवत होती. तिचा एकुलता एक आखोंका तारा सलीम मात्र अजूनही साखर झोपेतच होता. काल रात्री टीव्ही वर बघितलेला सांताक्लॉज त्याच्या स्वप्नात आला होता. ढेर सारी खेळणी आणि मिठाई घेऊन .

सलीम !!! अम्मीची निर्वाणीची हाक ऐकून त्याला कळून चुकले आता मात्र उठलेच पाहिजे . त्याने हळूच डोळे किलकिले केले सूरज किती उप्पर आला आहे याचा अंदाज घेतला आणि दुलई मधून बाहेर आला . त्याच्या डोळ्यात अजूनही झोप होती आणि डोक्यात खिलौने आणि मिठाई .

'जा जल्दीसे नहाके तैयार हो जा . नाश्ता तैयार है . स्कूल बस का वक्त हो रहा है' . अम्मीने त्याला पिटाळला . आवरताना आता त्याच्या डोक्यात स्कूल मधल्या दोस्तांचे विचार सुरु झाले होते . आज शौकत त्याने पकडलेला मेंढक घेऊन येणार होता. अचानक त्याला जाणवल, उठल्या पासून त्याला खूप सरदर्द होत होता . नाक पण सर्दीने जाम झाल्यासारखे वाटत होते.

'अम्मी मेरा सर बहोत दर्द कर रहा है , मै आज स्कूल नही जाता|' त्याने ओरडून अम्मीला विचारले .
'कोई बहाना नही चलेगा सलीम, वरना तेरे अब्बू को बोल दुंगी. '

अब्बुचे नाव घेताच सलीम घाबरून पटापट आवरून तयार झाला. गडबडीत कसेतरी दुध संपवून तो दफ्तर घेऊन निघाला. दारातून वळून त्याने अचानक अम्मीला प्रश्न केला अम्मी सांताक्लॉज अपने यहाभी आयेगा ?

सलीम बसमध्ये बसला आणि इकडे अम्मीला घालमेल होऊ लागली. मेरा बच्चा, उसको सरदर्द था और मैने दवा भी नही दी | तिला आता स्वतःचा राग यायला लागला .

इकडे सलीम बसमध्ये मित्रांमध्ये रमला होता . शौकत ने हळूच त्याला दफ्तर खोलून मेंढक दाखवला. मुलांची दंगा मस्ती चालू होती तेवढ्यात बस स्कूलमध्ये पोहोचली.सगळे आपापल्या क्लास मध्ये गेले , तास सुरु झाला आणि मुले अभ्यासात बुडून गेली . सलीमला अजूनही सरदर्द जाणवतच होता.

अचानक बाहेर खूप गडबड सुरु झाली. फटाके फुटल्यासारखे मोठे आवाज यायला लागले. काही कळायच्या आत एक धिप्पाड लांब दाढीवाला माणूस वर्गात घुसला . सगळीकडे एकच गोंधळ सुरु झाला . तो लांब दाढीवाला ओरडून काहीतरी सांगत होता . सालिमचे त्याच्या बोलण्याकडे लक्षच नव्हते . तो रात्रीच्या स्वप्नातल्या पांढऱ्या दाढीवाल्या

सांता बरोबर या दाढी वाल्याची तुलना करण्यात गुंतला होता . त्याला कुठेच सारखेपणा दिसेना. त्याची दाढी पांढरी होती, याची नाही. तो किती प्यारसे बोलत होता , हा किती जोरात ओरडतोय . तेवढ्यात त्या दाढी वाल्याची नजर सलीम कडे गेली . ‘ ए बच्चे , आंखे फाड के क्या देख रहा है’. सलीम अजूनही डोळे मोठे करून आ वासून त्याच्याकडे बघतच होता.

‘चल इधर आ' , त्याने फर्मावले .

‘बच्चा है , माफ करना’ त्याच्या टीचरने मध्ये पडायचा प्रयत्न केला .

दाढी वाल्याने एकवार टीचर कडे रोखून बघितले, बंदूक उचलली आणि चाप ओढला. वर्गात एकच सन्नाटा पसरला. त्या चिमुकल्यांनी हे कधी पहिल नव्हते व बघितले देखील नव्हते. सलीमने खाली पडलेल्या टीचर वरची नजर हटवून पुन्हा दाढीवाल्या कडे बघितले. दाढीवाला त्याच्या कडेच रोखून बघत होता. त्याने आता बंदुकीची नळी सलीमकडे वळवली. सलीमच्या डोळ्यात एकदम खूप भीती दाटून आली. त्याला जोरात अम्मीला हाक मारायची होती. त्याने हाक मारायला तोंड उघडले आणि पुन्हा एकदा चाप ओढला गेला. सलीमला आपल्या डोक्यात एकदम खूप दर्द झाल्याचे मेहसूस झाले. अगदी सकाळच्या सरदर्द पेक्षा खूप जास्त आणि क्षणात त्याच्या डोळ्यासमोर पूर्ण अंधेरा आला.

सलीमने डोळे उघडले तेव्हा त्याला कसलाच दर्द मेहसूस होत नव्हता . त्याने आजूबाजूला बघितले तेव्हा त्याला सगळा तेहेलका मचलेला दिसला. कुणी रडत होते, तर कुणी ओरडत होते. तेवढ्यात त्याला त्याच्या अम्मिचा आवाज ऐकायला आला. त्याने आवाजाच्या दिशेने खुशीने बघितले तर त्याला त्याची अम्मी कुणाला तरी छातीशी धरून जोर जोरसे रोताना दिसली. त्याने अम्मीला आवाज दिला , अम्मी , अम्मीजान ....... अम्मीचे त्याच्याकडे लक्षच नव्हते. तेवढ्यात त्याचे लक्ष अम्मीच्या बाजूला असलेल्या अब्बुंकडे गेले. त्याचे अब्बू सुद्धा रडत रडत अम्मीला धीर देत होते. त्याला एकदम कसेतरीच झाले. त्याने त्याच्या अब्बुंना कधीच रडताना बघितले नव्हते. त्याने अब्बुंना आवाज दिला , अब्बू , अब्बुजान ... मैं यहा हु I त्याच्या अब्बुंना पण त्याची हाक ऐकायला आली नाही.

त्याने त्याच्या अम्मी अब्बु कडे जाण्यासाठी पाय उचलला आणि त्याच्या जाणवले की तो एकदम पिसासारखा हलका झाला आहे , हळूहळू हवेत वर उचलला जात आहे. त्याने परत एकदा अम्मिकडे पहिले. आता त्याला आठवले, पिछले साल जेव्हा त्याची बडीमा अल्लाला प्यारी झाली होती तेव्हा देखील त्याची अम्मी अशीच फुटफुटके रो रही थी.

आता त्याला आपल्या आजूबाजूला कोणीतरी अजून असल्याची जाणीव झाली. त्याने अम्मीवरची नजर वळवली. त्याच्या आजूबाजूला त्याला त्याचे टीचर , त्याचा प्यारा दोस्त शौकत , इरफान , मोइनुद्दिन, अशपाक सगळे दिसायला लागले. तेही त्याच्या सारखेच हळूहळू वर जात होते. त्याच्या डोळ्यात आता पाणी दाटून आले. त्याला त्याच्या अम्मी अब्बुला सोडून कुठेच जायचं नव्हतं. अम्मीच्या कुशीत त्याला कसलीच भीती वाटत नसे. त्याचे अब्बू त्याला जुम्मेके दिन क्रिकेट खेळायला घेऊन जात. त्याला शोएब चाचा सारखंच फास्ट बोलर व्हायचं होतं. पेशावर एक्सप्रेस. त्याला नकळत हसू आले. त्याचे अब्बू त्याला लाडाने म्हणायचे. त्याने पुन्हा त्याच्या अम्मी अब्बू कडे नजर वळवली आणि त्यांना खुदाहाफिज केला आणि तो त्याच्या दोस्तांबरोबर जायला निघाला........अल्लाहताला कडे.

त्याच्या डोक्यात आता खूप प्रश्न सुरु झाले होते. त्याला अल्लाहतालाला विचरायचं होता की त्यानी आणि त्याच्या दोस्तांनी कोणता गुनाह केला होता की त्याने त्यांना पुन्हा बोलावून घेतले ? त्याला अल्लाहला विचारायचं होतं की आता त्याच्या अम्मीची काळजी कोण घेणार ? कितीतरी प्रश्नाची उत्तरे मागण्यासाठी तो निष्पाप जीव निघाला होता एका सफरला , पुन्हा कधीही परत न येण्यासाठी ..................

भावपूर्ण श्रद्धांजली ....

अलिकडेच पेशावरमधील अमानवीय आणि अतिशय अमानुष हत्याकांडात १३२ कोवळ्या निष्पाप जीवांचा बळी गेला. जसे वाहणाऱ्या वाऱ्याला आणि नदीच्या पाण्याला ना सीमांचे बंधन असते ना जातपात व धर्म. अगदी तसेच बालपणाचे. जगातल्या कुठल्याही धर्मात वा पंथात निष्पाप , निरपराधांची हत्या मान्य नाही. फुलपाखरा सारखे स्वच्छंदी भटकण्याच्या वयात या कोवळ्या कळ्या निर्दयपणे खुडल्या गेल्या.

कसं मानायचं की परमेश्वर आहे ? दिवसाआड घडणाऱ्या खून , बलात्कार आणि अतिरेकी घटना बघितल्या की विचारावेसे वाटते की द्रौपदीच्या वस्त्रहरणाला धावून गेलास मग दिल्लीत त्या अनामिकेवर अत्याचार झाला तेव्हा कुठे होतास ? ध्रुवबाळाच्या मदतीला निर्जीव खांबातून प्रकट झालास मग पेशावरमध्ये १३२ निष्पापांना वाचवायला का नाही गेलास ? एकच मागण जर पुन्हा या निष्पाप जीवांना पृथ्वीवर पाठवणार असशील तर मनुष्य जन्माला नको. असा जन्म दे की त्याना फक्त स्वच्छंदी आयुष्य असेल , आणि हो, मनुष्याच्या सावलीपासून सुद्‌धा दूर ठेव.